आकाशवाणी पुणे
प्रादेशिक वृत्तविभाग
राष्ट्रीय बातमीपत्र
सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

दिनांकः02.12.2025 वारःमंगळवार

---

•संसदेच्या हिवाळी अधिवेशनाला सुरुवात; मतदार यादी पुनरीक्षणासह विविध मुद्द्यांवर सरकार चर्चेला तयार असल्याचं संसदीय कार्यमंत्र्यांचं प्रतिपादन

•राज्यसभेचे अध्यक्ष म्हणून सी. पी राधाकृष्णन यांचे संसद सदस्यांकडून स्वागत.

•भारत प्रथमच आंतरराष्ट्रीय लोकशाही आणि निवडणूक साहाय्य संस्थेच्या अध्यक्षपदी आणि

•नवीन मोबाईल संचामध्ये संचार साथी ॲप आधीपासूनच कार्यान्वित करण्याचे केंद्राचे निर्देश

## संसद अधिवेशन

संसदेच्या हिवाळी अधिवेशनाला काल सुरुवात झाली. अधिवेशनापुर्वी संसद भवनाच्या परिसरात वार्ताहरांना संबोधित करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सर्व पक्षांना, हिवाळी अधिवेशन पराभवातून आलेल्या नैराश्याची युद्धभूमी किंवा विजयामुळे आलेल्या उन्मादाचा आखाडाही बनू नये यासाठी प्रयत्नशील राहाण्याचे आवाहन केले. नव्या पिढीच्या संसद सदस्यांना त्यांच्या मतदारसंघाच्या समस्या मांडण्यास प्रोत्साहन दिले पाहिजे. असंही ते म्हणाले.

## संसद अधिवेशन

संसदेच्या हिवाळी अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी संसदीय कार्यमंत्री किरेन रिजीजू यांनी सरकार मतदार यादी पुनरीक्षण, आणि इतर मुद्द्यांवर चर्चा करण्यास तयार आहे, असं सांगितलं. विरोधी पक्षांनी या मुद्द्यावर चर्चा करण्याची केलेली मागणी विचाराधीन असल्याचं ते म्हणाले.

या उत्तरावर समाधानी न झाल्याने काँग्रेस, अण्णा द्रमुक, तृणमूल काँग्रेस आणि इत विरोधी पक्षांनी सभात्याग केला. राज्यसभेचे नियोजित कामकाज झाल्यावर आजपर्यंत कामकाज तहकूब करण्यात आलं.

राज्यसभेत सभागृहाचे प्रथमच अध्यक्ष म्हणून काम पाहाणाऱ्या उपराष्ट्रपती सी. पी राधाकृष्णन यांनी संसदेच्या सर्वच सदस्यांना संविधानाचे पालन करण्याचं आणि संसदीय वर्तनाच्या लक्ष्मणरेषा पाळण्याचं आवाहन केलं.

तत्पुर्वी, अध्यक्षांचे संसद सदस्यांकडून स्वागत करण्यात आलं. यावेळी बोलताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी, राधाकृष्णन यांनी सामान्य परिस्थितीतून उपराष्ट्रपतीपदापर्यंत मारलेली मजल ही देशाच्या लोकशाही खरी ताकद दर्शवत असल्याचे म्हटले. तर राज्यसभेतले विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे यांनी अध्यक्ष म्हणून राधाकृष्णन यांचे स्वागत करताना, ते निष्पक्ष राहून सर्वच पक्षांना, सदस्यांना समान वागणूक देतील असा विश्वास व्यक्त केला. त्यानंतर विविध पक्षांच्या नेत्यांनीही सी. पी. राधाकृष्णन यांचे अध्यक्षपदाबद्दल अभिनंदन आणि स्वागत केले.

दरम्यान, हिवाळी अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी अनेक राज्ये, केंद्रशासित प्रदेशातील मतदार पुनरीक्षण कार्यक्रमासह विविध मुद्द्यांवर विरोधी पक्षांनी गदारोळ केल्याने लोकसभेचे कामकाज अनेकवेळा तहकूब करण्यात आलं. विरोधकांच्या गदारोळात, लोकसभेने मणिपूर वस्तू आणि सेवा कर कायद्यातील सुधारणा विधेयक २०२५ आवाजी मतदानाने मंजूर केले. शून्य प्रहरापुर्वी अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी अनुदानाच्या पुरवणी मागण्यांसोबत तीन विधेयके संसदेसमोर मांडली. तंबाखू आणि तंबाखूजन्य उत्पादनांवर उत्पादन शुल्क आकारणे तसंच पान मसाल्यावर नवीन उपकर लावण्यासंदर्भात दोन विधेयके मांडण्यात आली तर केंद्रीय उत्पादन शुल्क सुधारणा विधेयक तसंच आरोग्य सुरक्षा से राष्ट्रीय सुरक्षा उपकर विधेयक २०२५ देखील मांडण्यात आलं. तत्पूर्वी लोकसभेत सभापती ओम बिर्ला यांनी दिवंगत अभिनेता धर्मेंद्र, यांच्यासह अन्यदिवंगत सदस्यांना श्रद्धांजली वाहिली.

<u>नड्डा एडस्</u>
भारतात एचआयव्ही संसर्गाच्या नव्या रुग्णांमध्ये ३२ टक्के घट झाल्याचं केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री जे. पी. नड्डा यांनी काल सांगितलं. जागतिक एडस् दिनानिमित्त काल दिल्लीत झालेल्या कार्यक्रमात ते बोलत होते. एचआयव्हीबाबत जनजागृतीचे प्रमाण ८५ टक्के असून उपचारांची व्याप्ती ८८ टक्क्यांपर्यंत पोचल्याचे त्यांनी सांगितलं. एचआयव्ही, एडस्

प्रतिबंध आणि नियंत्रण २०१७ हा कायदा, कायदेशीररीत्या सुरक्षित, भेदभावमुक्त वातावरण प्रदान करत असून एचआयव्हीबाधित लोकांच्या हक्काचं संरक्षण करतो असंही त्यांनी नमूद केलं.

भारत अध्यङ

भारताला आंतरराष्ट्रीय लोकशाही आणि निवडणूक साहाय्य संस्था म्हणजेच इंटरनॅशनल आयडिया संस्थेचे अध्यक्षपद भूषवण्यासाठी पहिल्यांदाच आमंत्रित करण्यात आलं आहे. देशाच्या वतीनं मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार उद्या स्वीडनच्या स्टॉकहोममध्ये आयडियाचे अध्यक्षपद स्वीकारणार आहेत. भारतामध्ये मुक्त, निष्पक्ष वातावरणात पारदर्शकपणे निवडणुका पार पडतात हे जगाला माहित असल्याचं ज्ञानेश कुमार म्हणाले. त्यामुळेच देशातल्या नागिरकांसाठी आणि निवडणूक कर्मचाऱ्यांसाठीही हा अभिमानाचा क्षण आहे असंही ते म्हणाले.

संचार साथी

भारतात तयार होणाऱ्या तसेच आयात केल्या जाणाऱ्या सर्व मोबाईल हँडसेटमध्ये संचार साथी हे अँप आधीपासूनच इन्स्टॉल करण्याचे निर्देश केंद्र सरकारनं दिले आहेत. मोबाईल हँडसेटची सुरक्षितता आणि खरेदीतील फसवणूक टाळण्याच्या दृष्टीने हे अॅप महत्त्वाचं आहे. त्यामुळे बनावट हँडसेट खरेदी तसंच मोबाईल फोनचा गैरवापराची तक्रार करणं सोपे होणार आहे. फोनमधील हे अँप वापरकर्त्यांना पहिल्यांदा फोन सुरू करताना सहजपणे दिसावे आणि सुलभतेने वापरता यावे, तसेच अँपचे कार्य प्रतिबंधित अथवा मर्यादित नसावीत याची काळजी घेण्याचे निर्देश देण्यात आले आहे.

जीएसटी-संकलन

देशातल्या वस्तू आणि सेवा कर संकलनामध्ये, गेल्या वर्षीच्या नोव्हेंबरच्या तुलनेत ७ शतांश टक्क्याची वाढ नोंदवण्यात आली असून, १ लाख ७० हजार कोटी रुपये कर संकलित झाला आहे. गेल्या वर्षी, जीएसटी संकलन १ लाख ६९ हजार कोटी रुपये होते. यात केंद्रीय जीएसटी संकलन ३४ हजार ८४३ कोटी रुपये तर राज्य जीएसटी ४२ हजार ५२२ कोटी रुपयांचं झालं होता.

चर्चा

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल श्रीलंकेचे राष्ट्रपती अनुराकुमार दिस्सनायके यांच्याशी दूरध्वनीवरून संवाद साधला. 'ऑपरेशन सागरबंधू'च्या माध्यमातून श्रीलंकेतील

चक्रीवादळग्रस्त जनतेला मदत करण्याचं आश्वासन त्यांनी दिलं. ऑपरेशन सागर बंधू अंतर्गत दितवा चक्रीवादळाचा फटका बसलेल्या श्रीलंकेला भारतानं ५३ टन मदत साहित्य पोहोचवलं आहे. संभाषणादरम्यान राष्ट्रपती दिस्सनायके यांनी भारताच्या मदतीबद्दल मनापासून कृतज्ञता व्यक्त केली.

## रंगीत तालीम

नौदल दिनानिमित्त आज नौदल शक्ती प्रदर्शन होणार असून त्यासाठी संपूर्ण पोषाखामधील रंगीत तालीम काल संध्याकाळी तिरुअनंतपुरम इथं आयोजित करण्यात आली होती. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या प्रमुख उपस्थितीत मुख्य नौदल सराव आज दुपारी साडेचार वाजता सुरू होईल. राष्ट्राचा अभिमान असलेल्या आयएनएस विक्रांतवर काल संध्याकाळी शंखमुखम इथं झालेल्या या तालमीनं लोकांचं लक्ष वेधून घेतलं. लढाऊ विमानांनी विमानवाहू जहाजावरून उड्डाण केलं. जहाज कोसळण्याच्या परिस्थितीत केलेल्या बचाव आणि संरक्षण प्रात्यक्षिकही लक्षवेधी ठरलं.

## संगम

काशी – तमीळ संगममची चौथी आवृत्ती आजपासून उत्तर प्रदेशातील वाराणसी इथं सुरू होत आहे. केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान आणि उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ संयुक्तपणे या कार्यक्रमाचे उद्घाटन करणार आहेत. देशाच्या उत्तर आणि दक्षिणेकडील राज्यातील संबंध दृढ करणं हा या उपक्रमाचा उद्देश आहे. उद्घाटन समारंभ आज संध्याकाळी नमो घाट इथं होणार आहे. "चला आपण तमीळ शिकूया - तमिळ करकलम" असं यंदाच्या या महोत्सवाचं मुख्य सूत्र आहे. उद्घाटन समारंभात काशी आणि तमिळनाडूमधील पारंपरिक कलाकार विविध भारतीय संस्कृतीचा एक अद्भुत संगम दाखवत मंचावर एकत्र सादरीकरण करतील.

## दिल्ली सारस

सरस अजिविका फूड फेस्टिवल २०२५ला दिल्लीत कालपासून सुरुवात झाली. केंद्रीय ग्रामीण विकास मंत्रालयाच्या दीनदयाळ अंत्योदय योजना -राष्ट्रीय ग्रामीण उपजीविका अभियानाअंतर्गत याचं आयोजन करण्यात आलं असून महिला सक्षमीकरणाला चालना

देण्याच्या उद्देशानं हा भरवण्यात येतो. या महोत्सवातून भारतीय खाद्य संस्कृतीच्या वारसाची विविधता अनुभवता येणार आहे.

झियापंप्र

बांग्लादेशच्या माजी पंतप्रधान बेगम खालिदाय झिया यांच्या प्रकृतीविषयी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी चिंता व्यक्त केली आहे. त्यांच्या प्रकृतीमध्ये लवकर सुधारणा व्हावी यासाठी त्यांनी शुभेच्छा दिल्या आहेत.

दिल्ली स्फोट एनआयए

दिल्ली कार बॉम्बस्फोट प्रकरणाच्या तपासाचा भाग म्हणून राष्ट्रीय तपास यंत्रणेने जम्मू आणि काश्मीर तसंच उत्तर प्रदेशात अनेक ठिकाणी काल शोधमोहिम राबवली. यंत्रणेनं दिलेल्या निवेदनामध्ये जम्मू आणि काश्मीरमध्ये विविध जिल्ह्यातील आठ ठिकाणी आणि लखनौमध्ये एका ठिकाणी शोधमोहिम राबवण्यात आली.

महिला हॉकी

महिलांच्या एफआयएच हॉकी कनिष्ठ गटाच्या विश्वकरंडक स्पर्धेत, क गटाच्या साखळी सामन्यात महिला संघाने नामिबियाचा १३-० अशा पराभव केला. त्यामुळे गुणतक्त्यात भारत पहिल्या क्रमांकावर आला आहे. तर दुसऱ्या सामन्यात जर्मनीच्या महिला संघाने आयर्लंडवर विजय मिळवला. भारताचा सामना जर्मनीच्या संघाशी होणार आहे.

तर मदुराई इथं सुरू असलेल्या पुरुष कनिष्ठ गटाच्या विश्वकरंडक स्पर्धेत, पुरुषांचा संघ गटसाखळीच्या अंतिम सामन्यात आज स्वित्झर्लंडविरूद्ध खेळणार आहे.

हवामान

महाराष्ट्र, मराठवाडा, दिल्ली, हरियाणा, चंदीगड, आणि पंजाबच्या काही भागात थंडीची लाट येण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. तर हिमाचल प्रदेश, नागालँड, मणिपूर, मिझोराम, त्रिपुरा आणि ओडिशामध्ये धुक्याची परिस्थिती राहाण्याची शक्यता आहे. IMD ने आंध्र प्रदेश, तामिळनाडू, पुडुचेरी आणि कराईकलमध्येही मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवला आहे. केरळ आणि माहे येथील काही ठिकाणी आज विजांसह वादळ येण्याची शक्यता आहे.